महाराष्ट्र शासन

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव**

**GOVERNMENT MEDICAL COLLEGE, DHARASHIV**

कोविड-19 इमारत, जिल्हा रुग्णालय आवार, धाराशिव. (महाराष्ट्र) 413 501

**e-mail:** deangmcosmanabad@gmail.com

जा.क्र.शावैमधा/भांडार/रसायणे/दरपत्रक/1269 /२०२६, दिनांक: 15 /०४/२०२६

दरपत्रके

प्रति,

-------------------------

---------------------------

------------------------------.

विषय :- एक्स-रे फिल्म खरेदी करणे बाबत...

संदर्भ :- १) क्ष-किरणशास्त्र विभागाचे मागणीपत्र आ.क्र.२३४५, दिनांक ०८/०४/२०२६.

२) दिनांक १५-०४-२०२६ कार्यालयीन मंजुर टिप्पणी.

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन कळविण्यात येते की नवनिर्मीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव अंतर्गत **क्ष-किरणशास्त्र** विभागास रुग्णसेवेकरिता आवश्यक कन्ज्युमेबल्स व तद्नुषंगिक बाबी खरेदी करण्याची संस्थेस आवश्यकता आहे.

तरी, सोबत जोडलेल्या दरपत्रकात नमुद कन्ज्युमेबल्स व तद्नुषंगिक बाबी खरेदी करुन पुरवठा करणेकामी पात्र निविदा धारकांकडुन दरपत्रके मागविण्यात येत आहेत. यास्तव दि.१६/०४/२०२६ ते दि.२२/०४/२०२६ पर्यंत इच्छुक निविदाधारकांनी दरपत्रकातील विहित अटी व शर्तींना अनुसरुन अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव येथे कार्यालयीन वेळेत सिलबंद लिफाफा मध्ये खालील नमुद पत्त्यावर आपले दरपत्रक सादर करण्यात यावे. सिलबंद पाकीटावर मध्यभागी **"क्ष-किरणशास्त्र विभागासाठी आवश्यक कन्ज्युमेबल्स करिता दरपत्रके"** असा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

**सोबत:** दरपत्रक नोटीस जोडली आहे.

(डॉ. शैलेंद्र चौहान)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
धाराशिव.

प्रत:- १) सुचना फलक जाहीर नोटिस, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव.

२) संकेतस्थळ, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव.

२) विभाग प्रमुख, क्ष-किरणशास्त्र विभाग, शा.वै.म., धाराशिव.

**कार्यालयाचा पत्ता**

**अधिष्ठाता,**
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,**
**जिल्हा सामान्य रुग्णालय आवार,**
**धाराशिव-४१३५०१**

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव

### दरपत्रक नोटिस

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील क्ष-करिणशास्त्र विभागास रुग्णसेवेकरिता अत्यावश्यक कन्झ्युमेबल्स व तद्नुषंगिक बाबी खरेदी करणे कामी निविदा धारकाकडुन दरपत्रके मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक निविदाधारकांनी दि. १६/०८/२०२६ ते दि. २२/०८/२०२६ पर्यंत अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव येथे कार्यालयीन वेळेत सिलबंद लिफाफा मध्ये आपले दरपत्रक करार सादर करावेत.

**दरपत्रके सादर करतेवेळी अधिकृत लेटरहेड वर खालील प्रमाणे विहित नमुन्यात तसेच अटी व शर्तींना अनुसरुनच माहिती सादर करावी अन्यथा निविदा प्रक्रियेतुन अपात्र करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

| अ.क्र. | साधनसामुग्रीचे नाव | प्रति नग किंमत नमुद करावी (सर्व करांसहित) |
|---|---|---|
| ०१ | A४ Biodegradable papers for Dicom Embedded (not enabled) Printer with the required consumables (Size - A4, २०५GSM) | |
| Appropriate dicom O.K.I. printer with complete maintenance and consumables to print x-rays should be made available at no extra cost. The printer should be connectable to the available CR DR and CT scan machines in the radiology department. | | |

**अटी व शर्ती:**

०१) दरपत्रक मोहरबंद लिफाफा दिनांक २२/०८/२०२६ पर्यंत सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत कार्यालयात पोहचतील या बेताने पाठवावेत. जाहिर केलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाहीत/ ग्राह्य धरले जाणार नाहीत.

०२) सुचना फलक/ संकेतस्थळावरील जाहिर नोटीस प्रमाणे इच्छुक कंपनीस दरपत्रक मोहरबंद लिफाफा सादर करण्याची मुभा देण्यात येत आहे. दरपत्रक मोहरबंद **लिफाफा "अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव" यांचे नावे** विहित मुदतीत कार्यालयास सादर करावा.

०३) दरपत्रक मोहरबंद लिफाफ्यावर **"क्ष-किरणशास्त्र विभागासाठी आवश्यक कन्झ्युमेबल्स करिता दरपत्रके"** तसेच मोहरबंद लिफाफा जमा करण्याचा **अंतिम दिनांक** दरपत्रधारकाच्या नावाचा **शिक्का** इत्यादी नमुद असणे आवश्यक आहे.

०४) दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात सादर करावयाचे दस्त्ऐवज (Document):

- **जीएसटी (GST) क्रमांक असलेल्या अधिकृत लेटरहेडवर** दरपत्रक
- जीएसटी प्राधिकृत प्रत
- पॅन कार्ड
- शॉप ॲक्ट
- शासकीय कार्यालयामध्ये काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र (Valid PO)
- डेमो/ सॅम्पल रिपोर्ट **"ANNEXURE-A"** (सोबत नमुना जोडला आहे)
- एकल दरपत्रक धारक असल्याबाबतचे हमीपत्र **"ANNEXURE-B"** (सोबत नमुना जोडला आहे).

**(वरील सर्व दस्तऐवज दिलेल्या क्रमाने जोडण्यात यावेत).**

०५) निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनांकापुर्वी निविदेतील नमुद बाबींचा, खरेदी समिती/ उपभोक्ता विभागास नमुना (Sample) सादर करुन, त्याचा अहवाल **"ANNEXURE-A"** दरपत्रकामध्ये जोडणे बंधनकारक आहे.

०६) सर्वात कमी दर सादर करणाऱ्या पात्र निविदाधारकाचे दर हे पूढिल ०६ महिन्यांकरिता गोठविण्यांत येतील. कार्यालयाच्या आवश्यकतेनूसार वेळोवेळी त्याच दराने सामुग्री विहित वेळेत (०७ दिवसात) पूरवठा करणे बंधनकारक राहिल.

०७) अपवादात्मक परिस्थितीमुळे उक्त कोणत्याही अटी अथवा शर्तीमध्ये आवश्यकतेनुसार अंशत: बदल करणे अथवा प्राप्त झालेली दरपत्रके कोणतेही कारण/पुर्वसुचना न देता नाकारणे तसेच कोणत्याही स्तरावर निविदा प्रक्रिया रद्द करणे इ. अधिकार संस्थाप्रमुख (अधिष्ठाता) यांनी राखुन ठेवलेले आहेत.

**नोंद:- सदर दर पत्रके मा. अधिष्ठाता यांचे दालनात उघडण्याची वेळ दिनांक. २३/०८/२०२५ रोजी ११.३० वाजता राहिल. सदर नियोजित वेळेत कोणताही बदल झाल्यास निविदाधारकांना तशी पुर्वसुचना देण्यात येईल.**

(डॉ. शैलेंद्र चौहान)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव

# ANNEXURE-A

**Sample/ Demo Report**

(On Bidder Letters Head)

To
Dean Government Medical collage & Hospital.
Dharashiv-413501

**Ref: Your Tender/Quotation No-------------- & Date: ---------------**

| Sr No. | Name & Specificatins of Consumable/ Kits/ Lab Glassweare/ Chemicals published by buyer | Name & Specification quote by the tenderer | Whether the tender quoted by the supplier is as per specification asked for. Indicate against each item clearly YES/NO |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

Head of Department
Department of Radiology
Government Medical College,
Dharashiv

| एकल दरपत्रक अधिकृत विक्रेता/पुरवठादार/कंपनी यांचे लेटरहेडवर |
| --- |

Letter No. Date :-

प्रति
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
धाराशिव.

विषय :- एकल दरपत्रक सादर करणेसंबंधीचे हमीपत्र सादर करणेबाबत...

संदर्भ :- आपले दरपत्रक मागणी पत्र
क्रमांक. ____________________
दिनांक ____________________

महोदय

संदर्भांकित दरपत्रक मागणी पत्रानुसार मागणी करण्यात आलेले एकल दरपत्रक सादर करण्यासंबंधीचे हमीपत्र मी खालील प्रमाणे सादर करीत आहे.

## हमीपत्र (Undertaking)

याद्वारे हमी देतो की, दरपत्रक प्रक्रियेसाठी एकच दरपत्रक सादर करीत आहे. आमच्याच फर्मशी निगडीत असलेल्या कुठल्याही व्यक्तीच्या नावे किंवा अप्रत्यक्षपणे केवळ आम्हास लाभ होईल, अश्याप्रकारे दुसरे दरपत्रक दरपत्रकप्रक्रियेमध्ये सादर केलेला नाही. तसेच माझा/आमचा आपल्या कार्यालयातील खरेदी प्राधिकाऱ्यांशी कुठलेही हितसंबंध नाही.

उक्त बाब भविष्यात असत्य/खोटी आढळुन आल्यास, सर्वस्वी जबाबदारी आमची राहील. नियमानुसार होणाऱ्या कार्यवाहीस मी/आम्ही पात्र असू. तद्संबंधी माझी/आमची कुठलीही हरकत राहणार नाही. अशी याद्वारे हमी देत आहे.

| अधिकृत वितरकाचे नाव व स्वाक्षरी,<br>शिक्का अणि मोहर<br>Authorized Person Name,<br>Signature<br>with Stamp and Seal |
| --- |